मातृभूमि

# सावित्रीबाई फुले महाविद्यालयात सायबर सुरक्षेबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

मातृभूमि वृत्तसेवा

। महान, दि. ९ ।



स्थानिक सावित्रीबाई फुले महाविद्यालय येथे नुकतीच सायबर सुरक्षे बाबत कार्यशाळा संपन्न झाली. यावेळी अकोला येथील शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालयातील सानिका वाघमारे, व अदिती जनोरकार या सायबर वॉरियर्स नी ऑनलाईन फसवणूक, वाढता सोशियल मिडीयाचा वापर त्यामधून होणारी फसवणूक, आपण करीत असलेली ऑनलाईन खरेदी,नवनवीन मोबाईल मध्ये येणारे ऐप, फेसबुक अकाउंट हॅक कसे केले जाते, फेक वेबसाईटस कशा ओळखाव्या या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

ही कार्यशाळा क्विक हिल फाऊनडेशन पुणे आणि महाराष्ट्र सायबर यांच्या सहयोगाने व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जगदीश साबु आणि भौतिकशास्त्र विभागाचे डॉ. हरिदास खरात यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. कार्यशाळेचे अध्यक्ष, इंगोले मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी शिक्षक सर्व शाळेचे विद्यार्थी व कर्मचारी उपस्थित होते.अशी माहिती सानिका वाघमारे,आदिती जानोरकार यांनी दिली आहे.

Akola city Edition
Aug 10, 2024 Page No. 2
Powered by: erelego.com